Vidyawarta™
International Multilingual Research Journal

डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था, चांदा व्दारा संचालित
आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ब्रम्हपुरी, जि.चंद्रपुर

व्दारा आयोजित

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे २९ वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. १८ व १९ जानेवारी २०१९

# "जनसंवाद आणि सामाजिक माध्यमांचा भारतीय समाजावर प्रभाव"

**मुख्य संपादक**

**डॉ. स्निग्धा राजेश कांबळे,**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर

**सहसंपादक**

**डॉ. कुंदन दुफारे,**

श्री. जी. सी. पा. मुनघाटे महाविद्यालय, धानोरा, जि. गडचिरोली

**संपादक मंडळ**

**डॉ. अशोक सालोटकर,**
गो. वा. महाविद्यालय, नागभीड, जि. चंद्रपुर

**डॉ. संजय कुंभारे,**
श्री गोविंदप्रभु कला, वाणिज्य महाविद्यालय,
तळोधी (बाळापुर), जि. चंद्रपुर

**प्रा. संजय चव्हाण,**
यादवराव पोशट्टीवार महाविद्यालय,
तळोधी (बाळापुर), जि. चंद्रपुर

**डॉ. विजय दिघोरे,**
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जि. नागपूर

**प्रा. बालाजी दमकोंडवार,**
नेवजाबाई हितकारीनी महाविद्यालय,
ब्रह्मपुरी, जि. चंद्रपुर

**डॉ. रविंद्र विखार,**
श्री गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय,
कुरखेडा, जि. गडचिरोली

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

39) समाजमाध्यमे व बदलते सामाजिक जीवन
डॉ. पद्मानंद मनोहर तायडे, वाशीम || 185

40) प्रसार माध्यम आणि स्त्री प्रतिमांचे वास्तव
प्रा. क्रिष्णा रा. पासवान, भंडारा || 187

41) सामाजिक चळवळी आणि माध्यमांची भूमिका
डॉ. दामोदर चंद्रभानजी दुधे, यवतमाळ || 192

42) समकालीन भारतीय समाजाच्या प्रश्नाच्या संदर्भात माध्यमांची भूमिका
कांबळे दलित सुभाषराव || 196

43) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आणि जनसवांद माध्यमांचा ...
प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड, कळंब || 200

44) भारतातील लिंगभाव, जाति व धर्म आणि माध्यमांचा हस्तक्षेप
प्रदिप सदाशिवराव निंदेकर, नागपूर || 204

45) प्रसार माध्यमे व बदलते ग्रामीण जीवन
श्री.नंदलाल भिमराव बर्डे || 210

46) मराठी वाहिनीवर दाखविल्या जाणाऱ्या कौटूंबिक मालिकांमधील ...
मोहिनी प्रकाश कनकदंडे, नांदेड || 212

47) स्त्रिमुक्ती चळवळ आणि माध्यमे
प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे, कार्यकारी प्राचार्य, कळमेश्वर || 217

48) प्रसार माध्यमे आणि बदलते जीवन प्रवाह
प्रा. डॉ. रणधीर साठे, चंद्रपूर || 219

49) भारतातील लिंगभेद, जाती व धर्म आणि माध्यमांचा आक्षेप
प्रा.गंगाधर वैजनाथ लांडगे, जिवती || 222

50) समाजमाध्यमावरील अफवांमुळे होणाऱ्या जमावहत्या (Mob Lynching)...
प्रा. डॉ. गजेंद्र कढव, गडचिरोली || 226

51) जागतिकीकरणाचा व माहिती तंत्रज्ञानाचा भारतीय समाजावरील परिणाम
प्रा. किसन काशीनाथ घोगरे, वणी || 228

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned with OKEN Scanner

प्रतिकुल गोष्टींचा, बाबींचा प्रसार होत असला तरी त्यापैकी कोणत्या बाबींना आपण महत्व दिले पाहिजे हे महत्वाचे आहे. तसेच प्रत्येक माध्यमांनी आपली जबाबदारी ही कोणत्याही राजकीय पक्ष, पुढारी, अधिकारी वा कंपनी यांच्या दबावाखाली न राहता योग्य माहिती प्रसारित करून समाजामध्ये सलोख्याचे व विकासाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास विकासाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास भारत एक महासत्ता बनल्याशिवाय राहणार नाही.

**निष्कर्ष:—**

१. माध्यमांमुळे भारतीय संस्कृती ऱ्हासाच्या वाटेवर असलेली दिसून येते.
२. माध्यमांना मिळालेल्या अभिमत स्वातंत्र्यांच्या गैरवापरामुळे वाईट बातम्यांचा/गुणांचा प्रसार होत आहे.
३. प्रसार माध्यमातून अनेक सामाजिक प्रश्नांची निर्मीती होत आहे.

**संदर्भग्रंथ सूची:—**

१. रा.ज. लोटे :. भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, पृष्ठ क. २३.
२. रा.ज. लोटे :. समाजशास्त्र परिचय, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, पृष्ठ क ८१.
३. समाजशास्त्र — इयत्ता १२वी — महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे — ४११००४, पृष्ठ क. २१.
४. कित्ता— पृष्ठ क. ८२.
५. रा.ज. लोटे :. भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, पृष्ठ क. २०३.
६. भारतीय सामाजिक समस्या — दूरशिक्षण संचालनालय, पृष्ठ क. ३३.
७. समाजशास्त्र — इयत्ता १२वी — महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे — ४११००४, पृष्ठ क. १५५.
८. www.mpscacademy.com

□□□

43

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची i =d kfj r k आणि जनसवांद माध्यमांचा भारतीय समाजावरील प्रभाव

**प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड**
समाजशास्त्र विभागप्रमुख,
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

***********

**प्रस्तावना :**

भारत देशातील समाज व राष्ट्र परिवर्तनाचे अनमोल कार्य करणारे, आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजामध्ये क्रांती घडवून आणणारे युगनायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून संपूर्ण मागासवर्गीय, बहुजन, दलित, वंचित असलेल्या जन समुदायाच्या सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्न करण्यात आले. डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता आणि आजची पत्रकारिता यामध्ये फार मोठी विषमता दिसून येते. जनसंवाद हे माध्यम समाज परिवर्तनासाठी जरी आवश्यक वाटत असले तरी खऱ्या अर्थाने आजची ही जनसंवादाची प्रक्रिया सर्वसामान्य लोंकाना न्याय मिळवून देणारी आहे का? लोक कल्याणकारी आहे का? हे तपासून पाहणे गरजेचे वाटते. डॉ. बाबासाहेबांच्या काळातील जनसंवादाचे एक माध्यम म्हणून पत्रकारिता हे समाज परिवर्तन व समजाला दिशा देणारे एक महत्वपुर्ण माध्यम मानले गेले. समाजव्यवस्थेच्या बांधणीसाठी आणि समाजाला परिवर्तनासाठी लागणारी दिशा देण्याचे कार्य डॉ. बाबासाहेबांच्या पत्रकारितेतून झाली असेच म्हणावे लागेल.

आधुनिक कालखंडामध्ये वृत्तपत्रांना लोकशाहीच्या प्रमुख आधार स्तंभापैकी एक स्तंभ म्हणून मानले जाते. याला महत्वाचे कारण म्हणजे वृत्तपत्रांची लोकाभिमुख समाजजीवनाशी असलेली बांधिलकी हे होय. म्हणून प्रसार माध्यमांनी आपली



Scanned with OKEN Scanner

जबाबदारी समाज हिताच्या दृष्टीने पार पाडली पाहिजे. ज्या पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जनसंवादाचे एक माध्यम म्हणून प्रत्रकारितेच्या सहाय्याने समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले. आजच्या सद्यपरिस्थीत जनसवांद माध्यमांनी समाजहिताच्या कार्याला महत्व देवून उच्चभ्रु समाज व्यवस्थेकडून गोर–गरिबांवर होणाऱ्या अन्यायाला थांबविण्यासाठी वाचा फोडण्याचे कार्य करणे गरजेचे आहे. अलिकडच्या काळात विकलेल्या जनसवांद या सामाजिक माध्यमांवर लोकांचा विश्वास राहिलेला नाही. डॉ. बाबासाहेबांच्या काळातील पत्रकारिता हे जनसवांदाचे माध्यंम समाजहिताचे कार्य करीत होते. तसे आज देखील प्रसार माध्यम आणि पत्रकारितेच्या माध्यमातून लोक कल्याणकारी कार्याची गरज असलेले दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता समजून घेणे.

२. जनसवांद माध्यंमाचा भारतीय समाजावरील प्रभाव समजून घेणे.

**गृहितकृत्ये :**

१. पत्रकारितेचे स्वरूप आजच्या काळात बदलत असलेले दिसून येते.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेची आवश्यकता आजच्या परिस्थितीत महत्वाची वाटते.

३. जनसवांद माध्यंमाचा भारतीय समाजावर पडत असलेल्या प्रभावामुळे मानवतावादी विचार धुसर होत आहेत.

**अभ्यासपद्धती :**

शोध निबंध हा संशोधनाचा एक भाग असतो. ज्या प्रमाणे संशोधनातून संशोधक हा एखाद्या समस्येचे सुत्रण करतो आणि निष्कर्षाप्रत पोहचतो. त्याच प्रमाणे शोध निबंधात देखील एखादी समस्या निश्चित करून त्या समस्येची कारणमिमांसा केली जाते. आणि समस्येच्या सोडवणूकीसाठी शिफारशी सुचविण्यात येतात. तसेच संशोधनाप्रमाणे शोध निबंधासाठी सुध्दा तथ्ये संकलित करण्याची गरज पडते. तथ्य संकलन म्हणजे अध्ययन विषयाच्या सखोल अभ्यासासाठी अध्ययन सामग्री गोळा करणे होय. हे तथ्य संकलन प्रामुख्याने दोन प्रकारे करण्यात येते.

**तथ्य संकलन :–**

**प्राथमिक स्त्रोंत –** प्राथमिक तथ्य संकलनाअंतर्गत गोळा करण्यात येणारी तथ्ये ही प्रामुख्याने निरिक्षण, प्रश्नावली आणि मुखाखत अनुसूची यांच्या माध्यमातून गोळा केली जातात.

**द्वितीयक स्त्रोंत–** द्वित्तीय तथ्य संकलन हे शासकीय अहवाल, पुस्तके, मासिके, ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्र तसेच प्रकाशित आणि अप्रकाशित ग्रंथाच्या माध्यमातून गोळा केली जातात.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनासाठी प्रामुख्याने द्वित्तीयक तथ्यांचा आधार घेण्यात आले असून ही तथ्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारिता आणि जनसवांद माध्यंमाचा भारतीय समाजावरील प्रभाव यांच्याशी संबंधीत असून ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके, मासिके, वर्तमानपत्र, अहवाल यांच्या माध्यमातून गोळा करण्यात आली आहेत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा आणि वृत्तपत्रांच्या उद्दिष्टांचा अभ्यास करतांना असे दिसून येते की, त्यांच्या वृत्तपत्रांनी सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक सुधारणा व परिवर्तनाला महत्त्वाचे स्थान दिले आहेच. सोबतच राजकीय स्वातंत्र्यालाही महत्वाचे स्थान दिलेले आहे. त्यांना समग्र परिवर्तन आणि सुधारणा अपेक्षित असल्यामुळे त्यांनी आपल्या वृत्तपत्रांची उद्दिष्टये निश्चित करताना सामाजिक सुधारणा–परिवर्तन आणि राजकीय परिवर्तन या दोन्ही विचार प्रवाहांना प्राधान्य देणारी उद्दिष्टये निश्चित केलेली आहेत. त्यांनी टिळकांपेक्षा आगरकरांच्या वृत्तपत्रांच्या उद्दिष्टांना आपल्या वृत्तपत्रांतून प्राधान्य देऊन तिसऱ्याच विचार प्रवाहाला स्विकारले.

डॉ. बाबासाहेबांच्या पत्रकारितेने समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्याची आणि राजकीय स्वांतत्र्य प्राप्तीची उद्दिष्टये ठरविल्यामुळे त्यांनी बुध्द, फुले, कबीर आणि छत्रपती शाहूंच्या स्वांतत्र्य, समता, बंधुता, न्याय या सामाजिक तत्वांना प्राधान्य दिले आहे तर स्वांतत्र्याच्या तत्त्वनुषंगाने त्यांनी व्यक्ती आणि



Scanned with OKEN Scanner

राष्ट्र यांच्या स्वांतत्र्याचा पुरस्कार केलेला आहे. त्यामुळेच त्यांनी ब्रिटिश राजवटीवर आवश्यक त्या प्रसंगी राष्ट्र उन्नतीच्या दृष्टीकोनातून कठोर टीकाही केली आहे. तसेच त्यांनी त्यांच्या वृत्तपत्रातून ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या शोषक स्वरुपावरही आपल्या अग्रलेखातून मांडणी केली आहे. डॉ. आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्रातील अग्रलेखांतून दलितमुक्तीच्या व अस्पृश्य मुक्तीच्या राजकीय सहभागाच्या अटीमधील विरोध आणि ब्राह्मणशाहीच्या नाळेशी इमान जोडलेल्या शत्रूपासून दलितांसह सर्व शोषितांना एकच मुक्तीचा मार्ग दाखविण्यासाठी दबाव तंत्राचा वापर केला आहे. इंग्रज सत्तेचा स्वपक्षाच्या हितासाठी प्रसंगी वापर केला आहे. म. फुल्यांच्या सामाजिक सुधारणेच्या क्रांतीकारी विचारांनुसार आपल्या वृत्तपत्रातून अग्रलेखन करुन मानवमुक्तीच्या लढ्यात प्राण ओतण्याचे कार्य केले आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समकालीन वृत्तपत्रांच्या उद्दिष्टांकडे पाहता असे चित्र मात्र आढळत नाही.

वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमे आणि पत्रकारिता यांच्याबाबतीत सामान्य जनता, दलित, बहूजन आणि आंबेडकरवादी जनतेमध्ये अनेक प्रकारचे गैरसमज निर्माण झाले आहेत. समाजाला दिशा देण्यासाठी, चळवळीला प्रबळ करण्यासाठी वृत्तपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीला स्वतःचे वृत्तपत्र नसते त्या चळवळीची अवस्था पंख नसलेल्या पक्षासारखी असते. ही वाक्ये बहूजन समाजाच्या सर्वे नेते आणि कार्यकर्ते म्हणत असतांना दिसून येते. सामान्यांचे हित जोपासणारी, बहूजनांच्या हितासाठी समाजात प्रखरपणे आपले विचार मांडणारी, चळवळीला दिशा देणारी, मतांना सडेतोडपणे प्रत्युत्तर देणारी प्रसारमाध्यमे व वृत्तपत्रे असावीत ही सार्वत्रिक भावना आहे. मात्र या भावनेचा व्यापार करणारे अनेक व्यापारी पत्रकार आणि प्रवचनकार अलीकडे उदयास आले आहेत. परंतु डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता म्हणजे पोटाची खळगी भरण्यासाठी आरंभीलेला उदयोग नाही. हे समजून घेण्यासाठी बाबासाहेबांनी 'रानडे, गांधी आणि जिना' या त्यांच्या भाषणात भारतातील पत्रकारितेविषयी केलेले भाष्य लक्षात घेतले पाहिजे. ते म्हणतात, 'एकेकाळी पत्रकारिता हा एक प्रतिष्ठित पेशा होता. परतु आजच्या सद्यपरिस्थितीत भारतीय समाज व्यवस्थेतील पत्रकारितेत व्यापार झाला आहे. आजच्या पत्रकारितेत समाजावरील अन्याय, अत्याचारांला न्याय मिळवून देण्याची प्रवृत्ती राहिलेली नाही. पत्रकारितेच्या माध्यमातून देखील सामान्यांचे शोषण भारतीय समाजात होत असतांना दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पत्रकारितेच्या क्षेत्रात सामाजिक प्रबोधन, सामाजिक परिवर्तन, सामाजिक सुधारणा आणि सामाजिक न्याय या तत्त्वांना उद्दिष्टे मानलीच त्याशिवाय स्वातंत्र्यालाही उद्दिष्टे मानलेले आहे. त्यांची सर्व वृत्तपत्रे याच ध्येयवादानी भारावलेली आहेत. नैतिकता हा तर त्यांच्या पत्रकारितेचा कणाच आहे. परंतु त्यांच्या समकालीन आणि आजच्या वर्तमान काळातील पत्रकारितेत ही उद्दिष्टे त्यांना ऱ्हास पावताना दिसून आली तसेच आज देखील पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना आपल्या जबाबदारीची जाणिवेचे धुसर होत चाललेले दिसून येते.

**जनसवांद माध्यमांचा भारतीय समाजावरील प्रभाव:**

जनसंवादाची साधने लोकसहभागाचे कार्य प्रभावीपणे घडवितात. प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे सर्वदूर पसरलेल्या, विविधतेने नटलेल्या समुदायाची जेव्हा संपर्क केला जातो तेव्हा त्यास जनसंवाद असे म्हणतात. जनसंवादाच्या यशस्वितेसाठी सुध्दा संवादाकडूनच जनसंवादाच्या यशस्वीतेकडे वाटचाल करता येते. आशयाची पूर्वनिश्चिती, योग्य माध्यमाची निवड आणि संदेश नियोजन असेल तर जनसंवादाची अपेक्षित उद्दिष्टे साध्य होऊ शकतात.

जनसवांद म्हणजे आधुनिक प्रसारमाध्यमे असे म्हटले जाते. जनसंवाद माध्यमातून समाजातील अनुकूल आणि प्रतिकूल घटकाचे सादरीकरण होत असते. जनसंवाद माध्यम हे समाज परिवर्तनाचे फार मोठे घटक आहे. परंतु आज या जनसंवाद माध्यमात काही समुदायाची मक्तेदारी निर्माण झाल्यामुळे जनसंवाद माध्यमातून समाज हिताचे कार्य व्यवस्थितपणे पार पाडल्या जात नाहीत. आजच्या २१ व्या शतकात सामान्यांचे शोषण करणारी व्यवस्था निर्माण झाली आहे. जनसंवाद माध्यमांचा भारतीय समाजावर फार मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो.



Scanned with OKEN Scanner

जनसंवादाच्या साधनांचा समाजजीवनावर होणारा प्रतिकूल परिणाम सुध्दा संशोधकाने नोंदविला आहे. जनसंवाद माध्यमात पुढील दोष असलेले दिसून येते.

१. ही साधने मागणी तसा पुरवठा करुन लोकांची अभिरुची बिघडवितात.
२. या साधनामुळे बालकांच्या जीवनशैलीवर प्रतिकूल परिणाम होतो.
३. सर्व पातळीवर नैतिक मूल्यांचा ऱ्हास दिसू लागले.
४. प्रत्येक क्षेत्रांत वरवरचे राजकारण व राजकीय हस्तक्षेप यास माध्यमे उत्तेजन देतात.
५. तसेच नकली कल्पकतेला वाव दिला जातो आणि खऱ्या कल्पकतेस प्राधान्य दिले जात नाही.

जनसंवाद माध्यमाचे साधन म्हणजे इलेक्ट्रानिक माध्यमांचे प्रतिकूल परिणाम देखील भारतीय समाजावर होत असतांना दिसून येते.

• इलेक्ट्रानिक माध्यमाद्वारे अल्प खर्चात मनोरंजन होत असले तरी त्यांचे सामाजिक प्रदूषण हे अधिक घातक आहे. हिंसा, गुन्हेगारी आणि बिभत्स शृंगाराचा अतिरेक हे दुष्परिणाम या माध्यमामुळे जगभर पसरत आहेत.

• उपग्रहाद्वारे प्रस्तृत होणाऱ्या या कार्यक्रमामुळे पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण होण्याचा धोका जाणवतो. भारत व अन्य आशियाई राष्ट्रांना खोटया चंगळवादाच्या विषारी विळख्यात अडकविण्याचे काम ह्या वाहिन्या करतात.

• अस्तित्वात नसलेल्या कृत्रिम पाश्चात्य जीवनाचे चित्रण वाहिन्यातील कार्यक्रमांद्वारे होते. या वाहिन्यातून प्रकटणारे अवास्तव चित्रण वाहिन्यातील कार्यक्रमांद्वारे होते.

• भौतिक जगात कोणतीही वस्तू सेवा वा कल्पना ही विकत घेता येते, असा उपभोगवादी भौतिक विचार समाजात मूल्यहीनता निर्माण करते. त्यामुळे स्थानिक सांस्कृतिक मूल्यांचा जोरदार हादरे बसतात. दूरचित्रवाणी माध्यम हे खोटया जाहिरातीमुळे कृत्रिम गरजा तयार करते.

• प्रत्येक वाहिन्यावर येणाऱ्या अतिरिक्त जाहिराती आणि भ्रमिक कल्पना यामुळे तरुणांना भौतिक उपभोगवादाच्या मृगजळाकडे धावावे वाटते व या भ्रमनिरासामुळे त्यांचे नित्य जीवन अधिक बिकट होते.

• दूरचित्रवाणीच्या वाहिन्या २४ तास उपलब्ध झाल्या तर त्यांचा सर्वात घातक परिणाम हा मुलांच्या शिक्षणावर व आरोग्यावर होतो.

• महिलांच्या प्रतिमांचा जाहिरातीमधील अवाजवी वापर हा स्त्रियांकडे उपभोग वस्तू म्हणून पाहण्यास प्रवृत्त करतो. त्यामुळे समाजातील स्त्रियांचा छळ वाढतो.

• एकीकडे जग 'खेडे' वा 'विश्वकुटुंब' बनल्याचा अभास निर्माण केला जातो. पण दुसरीकडे माणूस माणसापासून अधिक दूर जातो.

पत्रकारिता आणि जनसंवाद माध्यमांचा भारतीय समाजवर फार मोठे परिणाम होत असतांना दिसून येते. आज वेगवेगळया वाहिन्यांच्या महिलावर होणारे परिणाम, मुलांवर होणारे परिणाम, यामुळे माणसाला दैनंदिन जीवनात भिती देखील निर्माण झाली आहे. समाजाची संस्कृती आणि सामाजिक संरचनेचा विसर पडत चाललेला आहे. भारतीय समाजावर अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम होत असताना दिसून येते. परंतु प्रतिकूल परिणाम फार कठिण स्वरुपाचे असताना दिसून येतात.

संदर्भ :

१. खंडाळे विजया, (२००७), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता एक समाजशास्त्रीय विश्लेषण, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.
२. धारुरकर वि. ल., (२००८), जनसंवाद सिध्दात, चैतन्य प्रकाशन, औरंगाबाद.
३. धारुरकर वि. ल., (२०११), पत्रकारितेचा दीपस्तंभ: आ. बाळशास्त्री जांभेकर, भारतीय समाज विकास ॲकॅडमी, मुंबई.
४. राष्ट्रीय चर्चासत्र, (२०११), हिंदी आणि मराठी पत्रकारितेचे बदलते स्वरुप, शि. म. ज्ञा. मो. महा. कळंब.
५. राष्ट्रीय चर्चासत्र, (२०११), हिंदी और मराठी पत्रकारिता के बदलते स्वरुप, शि. म. ज्ञा. मो. महा. कळंब.
६. ऑनलाईन साहित्य.

❑❑❑



Scanned with OKEN Scanner